**प्रेसनोट** **ला.प्र.वि., जळगाव.**

**दि.०७.०१.२०२६**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | जळगाव |
| **फिर्यादी** | सरकारतर्फे श्री. हेमंत खंडु नागरे, वय ३७ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक** | जामनेर पोलीस स्टेशन जि.जळगाव गु.र.नं. /२०२६. |
| **अधिनियम व कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | वसीम राजु तडवी, वय २७ वर्ष, व्यवसाय-नोकरी, तलाठी, सजा-जामनेर, (वर्ग-३), तहसील कार्यालय, जामनेर, जि.जळगाव. |
| **लाचेची मागणी रक्कम** | ५,०००/- रुपये (पाच हजार रुपये) |
| **स्विकारली रक्कम** | ४,०००/- रूपये (चार हजार रुपये) |
| **थोडक्यात हकिगत** | यातील मुळ तक्रारदार हे जामनेर येथील रहिवासी असुन परिवारासह राहतात. तक्रारदार यांनी दिनांक १६/१२/२०२५ रोजी मौजे जामनेर येथील बिनशेती दोन प्लॉट कायम खरेदी केले आहे.<br>नमुद प्लॉटची खरेदी केल्यानंतर तक्रारदार व त्यांची पत्नीचे फेरफार नोंद करून त्यांचे नाव अधिकार अभिलेखात तसेच ७/१२ उतान्यावर दाखल करण्याकरीता आरोपी लोकसेवक वसीम राजु तडवी, तलाठी, सजा-जामनेर, जि.जळगाव यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- ची लाचेची मागणी केली, म्हणुन तक्रारदार यांनी दि.०७/०१/२०२६ रोजी वसीम राजु तडवी, तलाठी, जामनेर यांचेविरुध्द ला.प्र.वि., जळगाव कार्यालयात समक्ष तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची दि.०७/०१/२०२६ रोजी पडताळणी केली असता वसीम राजु तडवी, तलाठी यांनी तक्रारदार व त्यांची पत्नीचे नावे घेतलेल्या प्लॉटच्या फेरफार नोंद करून त्यांची नावे अधिकार अभिलेखात तसेच ७/१२ उतान्यावर दाखल करून देण्याचे मोबदल्यात पंच साक्षीदार यांचेसमक्ष ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती ४,०००/- रूपये लाच म्हणुन स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दि. ०७/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांचेकडुन यातील आलोसे वसीम राजु तडवी, तलाठी, सजा-जामनेर यांनी ४,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे, म्हणुन गुन्हा. |
| **सापळा कारवाई** | **१)** पर्यवेक्षण अधिकारी - श्री.योगेश ठाकुर, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. जळगाव<br>**२)** सापळा अधिकारी - हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगाव<br>**३)** सापळा पथक - पो.ना./बाळु मराठे, पोशि./भुषण पाटील, नेम. ला.प्र.वि., जळगाव<br>**४)** तपास अधिकारी - योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगाव |
| **मार्गदर्शन** | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक. |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आहवान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र नाशिक येथे सपंर्क करावा.**

सपंर्क पत्ता :- अल्पबचत भवन, मा. जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव.

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.inn

ई मेल/ऑनलाईन तक्रार :- spacbnashik@mahapolice.gov.in

टोल फ्रि क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२५७-२२३५४७७

व्हॉट्सअप क्रमांक :- ७५८८६६१०६४.